# Question Paper
## Set- I
**Std. – 10th MM/Semi**
**Subject – Marathi H.L.**

**Time: 3 hrs** **Marks: 80**

## विभाग – १ गद्य

**प्र.१ अ) पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती सोडवा.**

१) **कोष्टक पूर्ण करा.** २

मराठीने या भाषांमधील शब्द आपले मानले

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

भाषेमध्ये अनेक शब्द सतत येत असतात, कारण ती नदीसारखी प्रवाही असते. आपणही संगणकासंबंधी अनेक नवे इंग्रजी शब्द सातत्याने आत्मसात केले आहेत. मराठीने आजवर संस्कृत, फारसी, अरबी, कन्नड, इंग्रजी अशा अनेक भाषांमधले शब्द आपले मानले आहेत. 'टेबल' हा शब्द आता आपल्याला परका वाटत नाही; पण गरज नसताना इतर भाषांमधले शब्द आणि तेही मराठी भाषेचे व्याकरण झुगारून वापरणे योग्य नाही. 'मी स्टडी केली' म्हणण्यातून काय नवीन अर्थ कळतो? त्याऐवजी 'मी अभ्यास केला' म्हणणं योग्य नाही का?

भाषेतली गंमत जाणून घेण्याचा एक मार्ग म्हणजे शब्दांची व्युत्पती शोधणे. यातून आपल्याला खूप नवी माहिती मिळते. 'मोरांबा' या शब्दातल्या 'मोरा' चा मयुराशी संबंध नसून मोरस म्हणजे साखरेशी (जुन्या काळी साखर मॉरिशसवरून यायची म्हणून मोरस) संबंध आहे. शब्दांची पाळेमुळे किती दूरवर पसरलेली असतात, ते त्यातून कळते.

'कदर करणे' असे आपण म्हणतो. तो वाक्प्रचार आहे. 'कद्र' या अरबी शब्दापासून 'कदर' (म्हणजे गुणांची पारख) हा शब्द आपण घेतला आहे. शब्दांच्या मुळाकडे गेलो, की आपल्या चुकाही होत नाहीत. उदा. 'अनुसया' असे नाव नसून ते 'अनसूया' असे आहे. 'अन + असूया' अशी त्यातील संधी आहे. मनात असूया(मत्सर) नसलेली अशी ती 'अनुसया' हे कळल्यावर शब्द मनात पक्का रुजतो. तसेच 'जराजर्जर' या संस्कृतमधून आलेल्या शब्दाचा अर्थ आहे, 'वार्धक्याने' विकल झालेला!' यातील 'ज' चे उच्चार तालव्य(ज्य) आहेत. तर जरा(थोडे), जर(कलाबूत) या शब्दातील 'ज' चे उच्चार दन्तमूलीय आहेत. (दन्तमूलीय म्हणजे जे ध्वनी उच्चारताना जिभीच्या टोकाचा वरच्या दाताच्या मुळांना स्पर्श होतो असे ध्वनी) उच्चारावरही अर्थ अवलंबून असतो.

२) एका वाक्यात उत्तरे लिहा. २

अ) भाषेची गंमत जाणून घेण्याचा मार्ग कोणता? ब) भाषा नदीसारखी प्रवाही का असते?

३) 'गरज नसताना इतर भाषांमधले शब्द वापरुन बोलू नये' या लेखिकेच्या मताबाबत तुमचे मत सोदाहरण ३

स्पष्ट करा.

**ब) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) पूर्ण करा.** **२**

दरोडेखोरांनी अरुणिमाला चालत्या गाडीतून बाहेर फेकल्याचे परिणाम –

i) ……………. ii) ……………. iii) ……………. iv) …………….

११ एप्रिल, २०११ हा दिवस. लखनऊ स्टेशन गर्दीनं फुललेलं. पद्मावती एक्सप्रेसमध्ये कसेबसे चढत गर्दीतून मुसंडी मारत शिताफीने मी कॉर्नर सीट पटकावली. गाडीने वेग घेतला आणि माझे विचारचक्र सुरू झाले. ‘बस... एवढे कागदपत्रांचे काम झाले, की झालेच आपले पक्के.’ अचानक माझे लक्ष वेधून घेतले ते मला घेरून उभे असणा-या तरुणांनी. त्याचे लक्ष माझ्या गळ्यातल्या सोन्याच्या चेनवर होते; पण मीही काही कच्च्या गुरूची चेली नव्हते. त्यांनी डाव साधण्याचा प्रयत्न करताच जेवढी होती नव्हती तेवढी ताकद एकवटून मी माझ्याजवळ येणा-या प्रत्येकाला लाथाबुक्क्यांचा प्रसाद द्यायला सुरूवात केली. आश्चर्य म्हणजे, त्या डब्यातला प्रत्येकजण ‘अन्यायाविरुद्ध लढणं हे जणू पाप आहे’, अशा चेह-यानं मख्खपणे जागेवरच बसून राहिला. अखेर चोरांच्या सहनशक्तीचा अंत झाला. रात्रीच्या भयाण अंधारात माझे दोन्ही हात-पाय धरून त्या नराधमांनी मला चक्क चालत्या गाडीतून बाहेर फेकून दिलं. शेजारून जाणा-या एका भरधाव रेल्वेवर मी आदळले आणि तिच्या वेगामुळे आणखी जोरात दोन धावपट्ट्यांच्यामध्ये उडून पडले. ‘अरुणिमा, रेल्वे येतेय आणि तुझे पाय ट्रॅकवरुन बाजूला घे’, हा अंतर्मनातला संदेश मेंदूपर्यंत पोचेतोवर खूप उशीर झाला होता. त्याआधीच एक रेल्वे माझ्या पायांवरून धडधडत निघून गेली. नंतर महिला आयोगाने प्रसिद्ध केलेल्या रिपोर्टनुसार, तब्बल ४९ रेल्वेगाड्या त्या रात्री माझ्या पायावरून गेल्या…. एका पायाच्या गुडघ्यापासून खालच्या हाडांचा तर चक्काचूर झालाच होता; पण दुस-या पायाचीही दुरावस्था झालेली.

**२)** एका वाक्यात उत्तरे लिहा. **२**

अ) चोरांनी अरुणिमाला रेल्वेतून बाहेर का फेकून दिले?

ब) अरुणिमाच्या डोक्यात कोणते विचारचक्र सुरू झाले?

**३)** 'अन्यायाविरुद्ध लढणे जणू पाप आहे' या विधानाविषयी तुमचे विचार लिहा. **३**

**क) पुढील उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

**१) आकृती पूर्ण करा.**

**अ)** **१**

| निसर्गावर प्रेम करणारा माणूस असा असतो | |
|---|---|
| ………… | ………… |

**ब)** **१**

| जीवनात यापासून सुखसोयी मिळतात | |
|---|---|
| ………… | ………… |

प्रत्येक सुजाण, सुविचारी माणूस निसर्गावर प्रेमच करतो. तरीही स्वतःच्या सुखासाठी आपण निसर्गाची हानी करतो. नैसर्गिक संपत्तीचा अमर्याद वापर करतो. ह्याचा आपण गंभीरपणे विचार करायला नको कां?

काळाची चक्रं उलट दिशेने फिरवता येणार नाहीत. आज वीज, पाणी, झाडं ह्यापासुन बनलेल्या अनेक सुखसोयीशिवाय माणूस राहू शकणार नाही. पण किमान निसर्गाचा वापर गरजेपुरता करावा. नैसर्गिक संपत्तीची विनाकारण नासाडी होऊ नये आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न करावा. ह्या गोष्टी तर आपल्या हातात आहेत? आज जगभरात हा विचार पसरतो आहे. कोस्टॅरिका, केनिया आणि काही पुढारलेल्या देशांत 'निसर्गाशी मैत्री' हे तत्त्व वापरुन काही सुरेख आदर्श हॉटेल्स बांधली गेली आहेत.

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **२**

अ) माणूस निसर्गाची हानी का करतो?

ब) माणसाने कशासाठी प्रयत्न केला पाहिजे?

## विभाग – २ पद्य

**प्र.२ अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१) कोष्टक पूर्ण करा.** **२**

मन वाईट गोष्टींकडे वळू नये म्हणून या गोष्टी कराव्यात

↓ ↓ ↓ ↓

| | | | |
|---|---|---|---|
| | | | |

| | |
|---|---|
| सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो; | स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो; |
| कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो; | पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो \|\| |
| सादंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो; | मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली, |
| वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो \|\| | क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; \| |
| न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो; | कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी, |
| न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गी वळो; \| | तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी \|\| |

**२) एका वाक्यात उत्तरे लिहा.** **२**

अ) आत्मबोधाने कशाचा नाश व्हावा?

ब) मनातील इच्छा कशामुळे पूर्ण होतील?

३) 'सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो' या ओळीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा. **२**

४) 'न निश्चय कधी ढळो, कुजनविघ्नबाधा टळो' या ओळीचा तुम्हाला कळालेला अर्थ लिहा. **२**

**ब) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कोणत्याही एका कवितेसंबंधी खालील कृती सोडवा.**

**आश्वासक चित्र किंवा खोद आणखी थोडेसे**

१) कवितेचे कवि / कवयित्री – १

२) कवितेचा रचनाप्रकार – १

३) कवितेतून मिळणारा संदेश – २

**क) रसग्रहण – खालील ओळींचे रसग्रहण करा.** ४

"तुझ्या डरकाळीने हादरलं आकाश; डचमळली पृथ्वी

आणि बघता बघता चवदार तळ्याला आग लागली."

**विभाग ३ – स्थूलवाचन**

**प्र.३ कोणत्याही दोन कृती सोडवा.** ६

१) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

२) 'मधूचे कृत्य संवेदनशील मनाचे उत्तम उदाहरण आहे' या विधानाबाबत तुमचा अभिप्राय स्पष्ट करा.

३) 'माणूस पेरा माणुसकी उगवेल' या विधानाचा तुम्हाला समजलेला अर्थ स्पष्ट करा.

**विभाग ४ – भाषाभ्यास**

**प्र.४ अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

१) **समास** – सामासिक शब्द आणि समास यांच्या जोड्या लावा. २

| समासिक शब्द | | समास |
|---|---|---|
| दररोज | – | द्विगु समास |
| मागेपुढे | – | वैकल्पिक द्वंद्व समास |
| नवरात्री | – | इतरेतर द्वंद्व समास |
| तीनचार | – | अव्ययीभाव समास |

२) **शब्दसिद्धी.**

अ) दोन अनुकरणवाचक शब्द लिहा. जसे – गडगडाट, तसे – i) ………….. ii) ………….. १

ब) 'प्र' हा उपसर्ग लावून तयार होणारे दोन शब्द लिहा – i) ………….. ii) ………….. १

३) **वाक्प्रचार – पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचे अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.** ४

i) आवर घालणे – …………….. ii) ज्ञात असणे – ……………..

iii) कुचेष्टा करणे – …………….. iv) रुंजी घालणे – ……………..

**आ) भाषासौंदर्य.**

१) **शब्दसंपत्ती.**

i) खालील शब्दाचे दोन अर्थ लिहा. १

अ) [ ] ← वजन → [ ]  ब) [ ] ← खोली → [ ]

ii) खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. १

अ) समाजाची सेवा करणारा – ………… ब) पाने गळून पडलेला – …………

iii) दिलेल्या शब्दांतील समानार्थी व विरुद्धार्थी शब्दांच्या चार जोड्या तयार करा. १

शब्द – आंधळा, कमाल, सतत, डोळस, अविरत, किमान, क्विचित, समान, चक्षू, कमी, नयन

| समानार्थी शब्द | विरुद्धार्थी शब्द |
|---|---|
| ……….. = ……….. | ……….. x ……….. |
| ……….. = ……….. | ……….. x ……….. |

iv) दिलेल्या शब्दापासून चार अर्थ पूर्ण शब्द तयार करा. १

| विमानतळ | – | | | | |
|---|---|---|---|---|---|

२) **लेखननियमांनुसार लेखन** – अचूक शब्द ओळखा. (कोणतेही चार) २

i) कर्तृत्व / करत्रुत्व / कर्तुत्व / केतुत्व ii) व्यक्ती / व्यक्ति / वक्ती / व्यकती

iii) सैरभैर / सइरभैर / सैरबैर / सैरभइर iv) प्रशीक्षण / प्रशिकषण / प्राशिक्षण / प्रशिक्षण

v) साराईत / सराईत / सराइत / साराईत vi) चिन्ह / चिह्न / चीनह / चीन्ह

३) **विरामचिन्हे.**

i) खालील वाक्यातील चुकीची विरामचिन्हे ओळखा व ती दुरुस्त करुन वाक्य पुन्हा लिहा. १

अरुणिमा. रेल्वे येतेय, आणि तुझे पाय ट्रॅकवरुन बाजूला घे?

४) **पारिभाषिक शब्द** – खालील शब्दांना प्रचलित मराठी भाषेतील शब्द लिहा. १

अ) Unit – …………… ब) Mobile – ……………

## विभाग – ५ उपयोजित लेखन

**प्र.५ अ) पुढील दोनपैकी कोणतीही एक कृती सोडवा.** ६

१) **खालीलपैकी कोणतेही एक पत्र लिहा.**

| तुमच्या शाळेच्या प्रयोगशाळेत लागणा-या उपकरणांची मागणी करण्यासाठी व्यवस्थापक, ग्लोबल सायन्टिफीक सेंटर, भवानी शंकर रोड, कोल्हापूर यांना विद्यार्थी प्रमुख या नात्याने पत्र लिहा. | **किंवा** | वडील खूप आजारी आहेत म्हणून तुम्हाला आठ दिवसांची रजा हवी आहे. त्यासाठी विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा. |
|---|---|---|

२) **सारांशलेखन** – प्र.१ क) मधील अपठीत गद्य उता-याचा एक तृतियांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा. ६

**आ) पुढीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.**

१) **जाहिरातलेखन** – दिलेल्या शब्दांवरून जाहिरात तयार करा. ५

| आईस्क्रीम | ज्यूस | मस्तानी | मिल्कशेक |
|---|---|---|---|

२) **कथालेखन – दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा.** ५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गरीब रिक्षावाला | कुटुंबाचे पालनपोषन | श्रीमंत माणूस बॅग रिक्षात विसरणे | बॅग परत देणे | रिक्षावाल्याचा प्रामाणिकपणा |

| | | | |
|---|---|---|---|
| बक्षिसीला नकार | मनाची श्रीमंती | मिळणारे फळ | तात्पर्य |

३) **बातमीलेखन** – तुमच्या गावात जलसंधारण मोहीम यशस्वी झाल्याचे बातमी लेखन करा.

**इ) खालीलपैकी एक कृती सोडवा.** ८ ८

१) **प्रसंगलेखन** – खालील मुद्द्यांच्या आधारे 'मी अनुभवलेला पहिला पाऊस' यावर निबंध लिहा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पावसापूर्वीचे वातावरण | विजांचा कडकडाट | गारांचा वर्षाव | अवर्णनी य आनंद | पावसाच्या बातम्या |

२) **आत्मकथन** – खालील मुद्द्यांच्या आधारे निबंध लिहा. (दिलेल्या चित्रातील व्यक्तीचे आत्मकथन करा.)



शेतक-याचे आत्मवृत्त – मुद्दे: मामाच्या गावी जाणे --- शेतक-याची भेट --- शेतक-याशी बातचीत --- शेतक-याचे मनोगत.

३) **वैचारिक** – कमवा आणि शिका – मुद्दे: शिक्षणाचे महत्त्व ---- स्वत: कमवून शिकण्याचे महत्त्व ---- शाळेतील योजनेचा उपयोग ---- कष्टाचे फळ ---- स्वावलंबनाचे महत्त्व.